साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028

✻ परळी वैजनाथ ✻ मंगळवार, दि. २७ जानेवारी २०२६ ✻ पाने-४ ✻ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशु प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## नगराध्यक्षा सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनानिमित्त परळी पालिकेत ध्वजवंदन व विविध सेवेचा शुभारंभ





परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळीच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते नगरपरिषद कार्यालयातील प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण हर्षोल्लासात झाले. यंदा नगरपरिषद कार्यालय प्रांगणात ध्वजारोहण समारंभ पार पडला. नगराध्यक्षा सौ.पद्मशीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते नगराध्यक्ष म्हणून त्यांच्या कारकिर्दीतील पहिले ध्वजारोहण प्रजासत्ताक दिनाचे ठरले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या अनुषंगाने ध्वजारोहण समारंभाला लोकाभिमुख उपक्रमांची जोड देत नगर परिषदेच्या माध्यमातून जनतेच्या सेवेत स्वच्छता व अग्निशमन विभागाची वाहने तसेच अन्य संसाधने लोकार्पण करण्यात आली.

नगर परिषदेत यंदापासून प्रजासत्ताक दिनाचे ध्वजारोहण छतावर न करता थेट खाली प्रांगणात आयोजित करण्यात आले. यामुळे कार्यक्रमाचा उत्साह वाढल्याचे बघायला मिळाले. परळी नगर परिषदेत निवडणुकीनंतरचे २६ जानेवारीचे ध्वजारोहण नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मशीताई बाजीराव धर्माधिकारी व नविन नगरसेवकांचे हे पहिलेच ध्वजारोहण होते. न.प.च्या माध्यमातून लोकहितांच्या कामाची जोड देत प्रजासत्ताक दिन समारंभ झाला.या कार्यक्रमानिमित्त नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या वतीने देशभक्तीपर गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सांस्कृतिक कार्यक्रमाने राष्ट्रभक्तीचे वातावरण नगरपरिषद परिसरात निर्माण झाले.

या कार्यक्रमात नगर परिषदेच्या वतीने स्वच्छता विभागातील संसाधनात भर घालणाऱ्या नविन १० हस्तचलित घंटागाड्या, अग्निशमन वाहन (टूल किटसह) तसेच वातानुकूलित शववाहिका यांचे लोकार्पण नगराध्यक्ष धर्माधिकारी व सर्व नगरसेवक पदाधिकारी, मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन व आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ही वाहने नागरिकांच्या सेवेत दाखल झाली आहेत. तसेच यावेळी रमाई घरकुल योजना व प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत नवीन प्रस्तावित आराखडयातील (DPR) फॉर्मचे वितरण करण्यात आले. यावेळी नगरपरिषद सदस्य, सदस्या, पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, मान्यवर न.प.चे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ✻✻✻

## नवीन प्राथमिक व न्यू हायस्कूल शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त सादर केलेल्या गुणदर्शनाच्या कार्यक्रमांनी परिसर दणाणुन गेला





परळी वैजनाथ, (बातमीदार):- प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी (ता.२६) येथील उर्जानगर वसाहतीतील मैदानावर मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक व न्यू हायस्कूल शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाने परिसर दणाणुन गेला. या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम पाहण्यासाठी विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

प्रजासत्ताक दिनानिमित्त उर्जानगर वसाहतीत नवीन प्राथमिक शाळा, न्यू हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली. ढोलताशाच्या गजरात व वंदे मातरम्, भारत माता की जय...च्या जयघोषाने वसाहतीचा परिसर दणाणुन गेला. या प्रभातफेरीत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते. प्रभातफेरीचे संयोजन ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब मुंडे, अमोल कांबळे, एल.आय.वाकडे, सौ.मस्के, श्री गडदे, कानिफनाथ सोळंके, विनोद देशमुख, भागवत मुंडे, श्री चौरे, श्री निरडे आदींनी केले.

प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे यांच्या हस्ते शाळेत ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी शालेय समितीचे सदस्य उत्तमराव देशमुख, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब देशमुख,
दिलीपराव देशमुख, संस्थेचे सदस्य अजय सोळंके यांच्यासह न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक के.व्ही.मोरे, पर्यवेक्षक दाजीबा नखाते, उमेश देशमुख, एल.आय.वाकडे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना खाउचे वाटप करण्यात आले. यावेळी बालवाडीचे विद्यार्थी शिवम हाके, सानवी बोबडे, दत्ता आघाव, भाग्यश्री केंद्रे व ओंकार झाटे आदी विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी यावेळी संगीत कवायत सादर केली. त्यानंतर बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी श्रीगणेशा ही गीतरचना सहअभिनय सादर केली. त्यास उपस्थितांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

त्यानंतर शाळेच्या समोरील मैदानावर विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम झाले. बालवाडीपासून दहावीच्या विद्यार्थ्यांनी सामुहिक कवायत, देशभक्तीपर गीत, लेझिम, कोळी गीत, लोकगीत, भारतीय संस्कृती व परंपरा, टिपरी, मनोरे आदी कार्यक्रम सादर केले. सुमारे ८५० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. लेझिम, टिपरी व भारतीय सांस्कृतिक परंपरा या नृत्याने परिसर दणाणुन गेला. उपस्थितांचा मोठा प्रतिसाद या कार्यक्रमांना मिळाला. या कार्यक्रमाला वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, उपमुख्य अभियंता श्री महाजन, श्री आवचार यांच्यासह अधीक्षक अभियंता श्री रेड्डी, भीमराव सिरसाट, श्री गरूड, श्री कोकाटे, श्री गर्जे इतर मान्यवर अधिकारी, कर्मचारी, शालेय समितीचे सदस्य बाळासाहेब देशमुख, अजय सोळंके, ॲड.मुंडे, पत्रकार राजेश साबणे यांच्यासह पालक, विद्यार्थी, परिसरातील नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात योग स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यशस्वी झालेला न्यू हायस्कूलचा अदित्य गणेश सोनोने या विद्यार्थ्याचा श्री इंगळे, बाळासाहेब देशमुख, श्री सोळंके यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. दरम्यान, प्रजासत्ताक दिनानिमित्त या मैदानावर मुख्य अभियंता श्री इंगळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांचे कौतुक केले. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नारायण वानखेडे, संजय सुरवसे, उमेश देशमुख, राहुल ताटे, विनोद वाघमारे, श्री बारस्कर, नागेंद्र जाधव, तानाजी शास्त्री, बाबासाहेब मुंडे, संजय वानखेडे, वर्षा हाके, सौ.भिसे, सतीश शहापूरे, अमोल कांबळे, विनोद देशमुख, भागवत मुंडे, कानिफनाथ सोळंके, व्ही.बी.कांबळे, प्राजक्ता खानापूरे, सारीका भोसले, आर.आर.जाधव, सौ.मलशेटवार, सौ.साकसमुद्रे, सौ.भाग्यश्री गंगणे, सौ.अनुराधा शिंदे, सौ.आर.पी.निटुरे, सौ.देवकर, सौ.आयोध्या राऊत, श्री शिंगणे, श्रीरामे, श्री चौरे, श्री निरडे, सौ.माने, हरि मुंडे, श्री चांगिरे, श्री कुलकर्णी, श्री टेकाळे आदींसह वीज केंद्राचे सुरक्षा कर्मचारी, शिक्षकांनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन एल.आय.वाकडे यांनी केले. ✻✻✻

# हनुमान व्यायाम शाळेत सूर्यनमस्कार स्पर्धा संपन्न



परळी वैजनाथ, (बातमीदार):- जागतिक सूर्यनमस्कार दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि.२५) आयोजित करण्यात आलेल्या भव्य सूर्यनमस्कार स्पर्धेत शहर व तालुक्यातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या स्पर्धा ५ वी ते १० वी व खुल्या गटात संपन्न झाल्याचे व्यायाम शाळेचे जेष्ठ संचालक दत्तात्पा ईटके गुरुजी यांनी सांगितले.

२५ जानेवारी हा दिवस जगभरात सूर्यनमस्कार दिन म्हणून साजरा केला जातो. सूर्यनमस्कार म्हणजे परिपूर्ण व्यायाम असल्याने विद्यार्थ्यांना व सर्वसामान्यांना सुध्दा या व्यायाम प्रकारामुळे आपले आरोग्य सुदृढ व निरोगी ठेवण्यास मदत होते. हनुमान व्यायाम शाळेतर्फे दर वर्षी जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा केला जातो. याही वर्षी हनुमान व्यायाम शाळेत विनामूल्य होणाऱ्या या स्पर्धेत दहावीच्या आतील विद्यार्थ्यांसाठी गट व सर्वसामान्य गट अश्या दोन गटात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पाचवी ते दहावीच्या गटात गणेश आरसुळे (वर्ग ८ वी) याने प्रथम क्रमांक पटकावला त्याने २२५ सुर्य नमस्कार केले. द्वितीय क्रमांक नागेश मेंगले (वर्ग ९ वी ) २२५ सुर्य नमस्कार, तृतीय क्रमांक आदित्य नागरगोजे (वर्ग ९ वी) २२५ सुर्य नमस्कार, उत्तेजनार्थ रोहन बागवाले, आदित्य सोनवणे यांनी तर खुल्या गटात अमन हमिद शेख (प्रथम), सुदर्शन किशनराव विखे (द्वितीय), समर्थ मनोज धोकटे (तृतीय), तर उत्तेजनार्थ करण गोपीनाथ गायकवाड, रणवीर श्याम गायकवाड यांनी पटकावला. अ गटातील स्पर्धेत २० जणांनी तर ब गटात १२ जणांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना व्यायाम शाळेचे जेष्ठ संचालक दत्तात्पा ईटके गुरुजी यांनी शुभेच्छा दिल्या. व आरोग्यासाठी सुर्य नमस्कार आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.या वेळी हनुमान व्यायाम शाळेचे सचिव सुभाष नाणेकर, उपाध्यक्ष त्रिंबकआप्पा काटकर, कोशाध्यक्ष महादेव फडकरी, सहासचिव अमर देशमुख सर,चंद्रकांत आप्पा समशेटे पत्रकार अनंत भातंगळे सर,नरसिंग देशमुख कुस्तीगीर परिषद उपाध्यक्ष शिवशंकर कराड, माजी नगरसेवक महादेव इटके यांनी विजेत्या स्पर्धाकांचे गुच्छ व चेक देवून यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी पंच म्हणून गोल्ड मेडिलिस्ट सोमेंद्र शास्त्री उपस्थित होते या वेळी कार्यक्रमाचे संचालन अध्यक्ष वैजनाथ इटके यांनी केले आभार प्रा उमाकांत कुरे यांनी केले. सूर्यनमस्कार स्पर्धास विद्यार्थी उपस्थित होते. ❋❋

# 'द स्कूल एक्सप्रेस'तर्फे आदर्श शिक्षक पुरस्काराने जमाल खान पठाण सन्मानित




बीड (बातमीदार):- शिक्षण क्षेत्रात मागील तेरा वर्षांपासून कार्यरत असलेल्या व आपल्या कामातून आदर्श उभा केलेल्या परळी तालुक्यातील न्यू हायस्कूल शाळेचे ज्येष्ठ शिक्षक जमालखाँ मुसाखाँ पठाण यांना 'द स्कूल एक्सप्रेस' साप्ताहिकाच्या वतीने आयोजित 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे.

बीड येथील नगर रोडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य आणि मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांच्यासह नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा.डॉ.योगेश क्षीरसागर, ॲड.सय्यद अझहर अली, गटशिक्षणाधिकारी समंदर खान, दैनिक रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब, दैनिक सिटीझनचे संपादक शेख मुजीब, नानाभाऊ हजारे, भगवानराव सोनवणे, उत्तमराव पवार, जे.एम. पैठणे आदी मान्यवर उपस्थित होते. गौरवपत्र, शाल, स्मृतिचिन्ह देवून श्री पठाण सर यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला 'द स्कूल एक्सप्रेस'चे संपादक शेख एजाज, प्रा.सुनील खंडागळे, हर्षल केकण, मुजतबा खान आदी मान्यवरांसह शिक्षक, कर्मचारी, पत्रकार उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल श्री पठाण सर म्हणाले, हा पुरस्कार म्हणजे माझ्या शैक्षणिक प्रवासाची पावती असून, यामुळे भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे. या गौरवाबद्दल सिरसाळा परिसर आणि शैक्षणिक वर्तुळातून पठाण सरांचे अभिनंदन होते आहे. ❋❋❋

# ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील जाचक अटी रद्द करा

## वृत्तपत्र संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



माजलगाव (बातमीदार):- महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील जाचक व अन्यायकारक अटी तात्काळ रद्द करून, पात्र असलेल्या सर्व ज्येष्ठ पत्रकारांना सन्मानपूर्वक योजनेत समाविष्ट करावे, अशी ठाम मागणी असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया (महाराष्ट्र प्रदेश) चे राज्य अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य शासनाने ज्येष्ठ पत्रकारांसाठी सुरू केलेली सन्मान योजना ही अत्यंत स्वागतार्ह व प्रेरणादायी योजना असून, ६० वर्षे पूर्ण झालेल्या व किमान २५ वर्षे पत्रकारितेची सेवा केलेल्या पत्रकारांना दरमहा सन्मानपूर्वक मानधन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक पात्र व अनुभवी ज्येष्ठ पत्रकार या योजनेपासून वंचित राहात असल्याची गंभीर बाब निदर्शनास येत असल्याचे कुलकर्णी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

कुलकर्णी म्हणाले की, ❋राज्यात असे अनेक ज्येष्ठ पत्रकार आहेत ज्यांनी आपले ४० ते ५० वर्षे पत्रकारितेसाठी समर्पित केली. समाजप्रबोधन, लोकशाही मूल्यांची जपणूक आणि सामान्य जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. मात्र आज वृद्धावस्थेत त्यांच्याकडे कोणतेही स्थिर उत्पन्नाचे साधन नाही. अशा परिस्थितीत जाचक अटी, तांत्रिक त्रुटी किंवा किरकोळ कारणांवरून त्यांचे अर्ज नामंजूर करणे हे अन्यायकारक आहे.

एकदा अर्ज नामंजूर झाल्यानंतर, संबंधित पत्रकाराने सर्व त्रुटी पूर्ण करून पुन्हा अर्ज सादर केला तरी त्यावर फेरविचार केला जात नसल्याची बाबही अत्यंत गंभीर असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. यामुळे अनेक ज्येष्ठ पत्रकार मानसिक व आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर, कुलकर्णी यांनी शासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत. ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेतील अनावश्यक व जाचक अटी रद्द कराव्यात, ६० वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या व किमान निकष पूर्ण करणाऱ्या सर्व ज्येष्ठ पत्रकारांना तात्काळ योजनेत समाविष्ट करावे, पूर्वी नामंजूर झालेल्या अर्जांवर फेरविचार करण्याची संधी द्यावी, तांत्रिक किंवा शुल्लक त्रुटींमुळे कोणत्याही ज्येष्ठ पत्रकाराचा अर्ज नामंजूर करू नये. माननीय मुख्यमंत्री महोदय हे संवेदनशील व लोकाभिमुख नेतृत्व असल्याने ते या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देतील व सर्व ज्येष्ठ पत्रकारांना सन्मान योजनेचा लाभ मिळेल, असा निर्णय घेतील, असा विश्वासही कुलकर्णी यांनी व्यक्त केला आहे. ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान म्हणजे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा सन्मान आहे. शासनाने या बाबीकडे मानवीय दृष्टिकोनातून पाहावे असेही कुलकर्णी यांनी यावेळी नमूद केले. ❋❋❋

# परळी नगरपालिकेच्या वतीने ओपन ड्रेन डेसिल्टिंग मशीन कार्यान्वित



परळी वैद्यनाथ (बातमीदार):- केंद्र सरकारच्या GeM (गव्हरमेंट ई-मार्केटप्लेस) पोर्टलवरून परळी नगरपालिकेने खरेदी केलेली ओपन ड्रेन डेसिल्टिंग मशीन तब्बल एक वर्षाहून अधिक काळ वापरात नसल्याने धूळखात पडून होता. मात्र शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आज हे अत्यंत उपयुक्त यंत्र प्रत्यक्ष उपयोगात आणण्यासाठी सेवेत कार्यान्वित करण्यात आले. त्यामुळे शहरातील अरुंद भागातील स्वच्छतेची कामे करण्यासाठी गती मिळणार आहे.

परळी वैजनाथ शहरातील अनेक अरुंद भाग, गल्लीबोळा, दाट वस्तीचे भाग तसेच ज्या ठिकाणी मोठ्या आकाराची जेसीबी पोहोचू शकत नाहीत, अशा ठिकाणी स्वच्छता, गाळ काढणे, कचरा हटवणे आणि लहान स्वरूपाची खोदकामे करण्यासाठी ओपन ड्रेन डेसिल्टिंग मशीन अत्यंत उपयुक्त ठरणारे उपकरण आहे.. ही गरज लक्षात घेऊन नगरपालिकेने कंत्राटी तज्ञ ऑपरेटरची नियुक्ती करत आज विधिवत श्रीफळ वाढवून या यंत्राच्या वापराची सुरुवात केली. या प्रसंगी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, बाजार समिती सभापती सूर्यभान मुंडे, माजी उपनगराध्यक्ष तथा रा.कॉ. शहराध्यक्ष आयुब पठाण, गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक शेख इस्माईल, नितीन रोडे, अनंत इंगळे,अल्ताफ पठाण, नगरसेवक अजिज कच्छी, जयराज देशमुख, माजी नगरसेवक राजेंद्र सोनी,संपादक मोहन व्हावळे, तुकाराम धोत्रे, महेंद्र रोडे,गोविंद कुकर यांच्यासह नगरपालिकेतील स्वच्छता विभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. यावेळी शहरातील स्वच्छतेसाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा प्रभावी वापर करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या मशीन च्या माध्यमातून नियमित स्वच्छता मोहिमा अधिक वेगाने व कार्यक्षमतेने राबवता येणार असून विशेषतः पावसाळ्यापूर्वी नाले, गटारे स्वच्छ करण्यास मोठी मदत होणार आहे. शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी अशा यंत्रांचा पूर्ण क्षमतेने वापर करण्यात येणार आहे.परळी शहरातील स्वच्छता व्यवस्थेला यामुळे आणखी बळ मिळाले आहे.आगामी काळात याचा थेट लाभ नागरिकांना होणार आहे.दीर्घकाळ उपयोगात नसलेले हे यंत्र प्रत्यक्ष कामात उतरवल्याने नागरिकांमधूनही समाधान व्यक्त होत आहे. ❋❋❋

# पालिकेच्या वतीने नागरिकांना त्रासदायक ठरणारे अनावश्यक गतिरोधक काढले व रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यास सुरुवात

परळी वैजनाथ (बातमीदार):- परळी नगर परिषदेचा कारभार हाती घेताच नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी कोणताही कालापव्यय न करता थेट कामाला सुरुवात केलेली आहे. केवळ आश्वासनांवर नव्हे, तर प्रत्यक्ष निर्णय आणि अंमलबजावणीवर भर दिला आहे. या अनुषंगानेच अनेक लोकाभिमुख कामांपैकी नागरिकांतून मागणी असलेल्या व प्रत्यक्ष नागरिकांचा संबंध येणाऱ्या कामाची तातडीने दखल घेत याबाबतचे कार्यवाही त्यांनी अतिशय तत्परतेने केली आहे.

नागरिकांना त्रासदायक ठरणारे शहरातील मुख्य रस्त्यावरील अनावश्यक गतिरोधक हटवणे हटवणे तसेच शहरातील रस्त्यांवर जोड पट्ट्यांच्या ठिकाणी असलेले खड्डे भराव टाकून व्यवस्थित करण्याच्या कामाला सुरुवात झाली असून नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.

शहरातील प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांवर नियमांना डावलून त्रासदायक ठरणारे गतिरोधके तयार करण्यात आली होती.या गतिरोधकांमुळे वाहनचालक, रुग्णवाहिका, ज्येष्ठ नागरिक व महिलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. याबाबतच्या सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक तक्रारी व मागण्या निवडणूक प्रचार दरम्यान व त्यानंतर नागरिकांनी नगराध्यक्ष ताई बाजीराव धर्माधिकारी यांच्याकडे केल्या होत्या. या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष न करता नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नगरपरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत कारवाईचे तात्काळ आदेश दिले. परिणामी अनेक ठिकाणी अनावश्यक व अनधिकृत गतिरोधक हटवण्यात आले. याचवेळी शहरातील रस्त्यांवरील खड्डे व खराब झालेले पॅचेस भराव टाकून बुजवण्याच्या कामालाही वेग देण्यात आला आहे.अनेक दिवस केवळ फाईलींमध्ये अडकून पडलेली कामे आता प्रत्यक्ष रस्त्यावर दिसू लागली आहेत. पावर हाऊस पासून रस्त्याचे पॅचेस दुरुस्त करून कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी, नगरसेवक वैजनाथ सोळंके, जयपाल लाहोटी , राजखान पठाण, इस्माईल शेख, आनंत इंगळे यांच्यासह नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या मागणीनुसार तात्काळ कारवाई झाल्याने व ही कामे सुरू झाल्याने नागरिकात समाधान व्यक्त होत आहे. कोणतीही घोषणा न करता थेट कृतीतून त्यांनी प्रशासनाला कामाला लावले असून नगर परिषदेत शिस्तबद्ध आणि परिणामकारक कारभाराची सुरुवात झाली आहे.मूलभूत नागरी सुविधांना सर्वोच्च प्राधान्य देत सुरू झालेल्या या कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ❋❋❋

संपादकीय...

# लूडबुडीला चाप ?

**※ सुविचार ※**

**निःस्वार्थ कर्म करत राहा, जे काही होईल ते चांगलेच होईल, थोडा उशीर होईल पण सर्वश्रेष्ठ होईल !**

पत्नी नगरसेविका झाली म्हणून निकालाच्या दिवशी आपल्या प्रभागात काढलेल्या विजयी मिरवणुकीत पतीने पैशाची उधळण करून जल्लोष केल्याची घटना आपल्या परळी शहरात पालिकेच्या निवडणूक निकाला दिवशी घडली. या घटनेच्या बातम्या समाजमाध्यमावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्या. शिवाय विविध न्यूज चॅनलवर व वृत्तपत्रातही प्रसिद्ध झाल्या. अशीच घटना आपल्या राज्यात एका गावात घडली. तेव्हा तिथल्या पालिकेच्या अधिकाऱ्याने विजयी झालेल्या नगरसेविकेच्या पतीविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल केला. परंतु अशी कारवाई आपल्या परळीत मात्र झाली नाही, हे वास्तव आहे. पुढे याच नगरसेविकेला उपनगराध्यक्ष पद मिळाले. तेव्हा शहरात गल्ली-बोळात, मुख्य रस्त्यावर, विविध चौकात, गर्दीच्या ठिकाणी उपनगराध्यक्षपदी निवड झाली म्हणून पत्नी ऐवजी पतीच्या अभिनंदनाचे शेकडो बॅनर शहरात झळकले. या बॅनरवर पतीराजाचे मोठ-मोठे फोटो विविध ॲक्शन मध्ये होते. संबंधित पतीने बुलेटवर बसलेला, खुर्चीवर बसून सही करीत असलेला, वाघा बरोबर चित्र असलेला अशा कितीतरी वेगवेगळ्या पोज देत आपली हाऊस या बॅनरवरून भागवली व पाठ थोपटून घेतली. अभिनंदन करणारे त्यांचे कार्यकर्त्यांचे फोटो या बॅनरवर होते. शिवाय या बॅनरवर पालिका निवडणुकीत निवडून आलेल्या पत्नीचा कुठेच फोटो नव्हता. हे आश्चर्य म्हणावे लागेल का दुर्दैव? या नेत्याच्या अभिनंदनाच्या बॅनरवर त्यांच्या नेत्यांचे फोटो होते. मात्र पहिल्यांदाच नगरसेविका झालेल्या पत्नीचा फोटो नाही; म्हणून नागरिकांत मोठी चर्चा होती. हा प्रकार परळीचाच नाही तर नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायत व महानगरपालिकेसह इतर अनेक निवडणुकीत आपण पाहत असतो. अशा निवडणुकीत निवडून येतो कोण व हार घालून विजयाचा गुलाल अंगावर घेत मिरवते कोण? हे आपण पहात असतो. निवडून आलेल्या महिलेचे पती, मुलगा, सासरा, सासू इतर नातेवाईक आपली हाऊस भागवून घेतात. हा प्रकार आपण गेल्या अनेक वर्षापासून निवडणुकीत पाहत आलो आहोत.

लोकशाही अधिक भक्कम व्हावी, राज्यकारभारात पुरुषांच्या तुलनेत महिलांचाही बरोबरीने सहभाग वाढावा, त्यांनीही देशहिताचे निर्णय घ्यावे, महिलांचे राजकीय सक्षमीकरण व्हावे, त्यांनी स्वतः निर्णय घेण्यास सक्षम व्हावे, म्हणून आपल्या सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देऊन लोकशाही अधिक भक्कम करण्यासाठी सत्तेची दारे महिलांसाठी खुली केली. हे करण्यामागे सरकारचा हेतू उदात्त व चांगला होता. परंतु निवडून आलेल्या महिलेला आपला अधिकार गाजवता येत नाही. त्यांची निवड केवळ शोभेची वस्तू होऊन बसते. निवडून आलेल्या अनेक महिलांचे पती, सासरे, मुलगा आदी मंडळीच कारभारी होत असतात. तेच निर्णय घेतात. ते संबंधित महिलेच्या नावावर आपला अधिकार गाजवतात. विविध शासकीय बैठकीत सहभागी होतात. यावेळी अधिकारीही डोळ्याला पट्टी बांधून मूग गिळून गप्प बसतात हे आपण पाहतो.

कोणत्याही निवडणुकीत निवडून आलेल्या महिलेचा नवरोबा व इतर मंडळीच्या हस्तक्षेपाला, त्यांच्या लूडबुडीला चाप लावण्यासाठी न्यायपालिका व सरकारने आता ठोस भूमिका घेण्याचा निर्णय घेतला आहे. निवडून आलेल्या महिलेचा कारभार, अधिकार पती किंवा इतर मंडळी पहात असेल तर कोणीही जागरूक नागरिकांनी किंवा विरोधकांनी अशा हस्तक्षेपाचे सबळ पुरावे संबंधित सरकारी यंत्रणेकडे सादर केल्यास त्याची सखोल चौकशी होऊन त्यात सत्यता आढळल्यास तात्काळ कारवाई करण्याची तरतूद या निर्णयात करण्यात आली आहे. या कारवाईत संबंधित महिलेचे पद रद्द तर होतेच. शिवाय पुढील निवडणुकीत निवडणूक लढवण्यावर गंडांतर येते. त्यांना अपात्र ठरवले जाऊ शकते. पती किंवा इतर नातेवाईकांच्या हस्तक्षेपामुळे आरक्षणाचा मूळ हेतू बाजूला राहणे, महिलांची कुचंबना होणे, त्यांचे नेतृत्व दबले जाऊ शकते म्हणून वरील निर्णय सरकारने घेतला आहे. सत्तेत महिलांना समान वाटा व त्यांचे राजकीय सक्षमीकरण व निर्णय घेण्यास महिला सक्षम व्हाव्यात, म्हणून सरकारने महिला आरक्षणाचा निर्णय घेतला. परंतु याचा दुरुपयोग अधिक झाला. आता याबाबत सरकारने घेतलेल्या वरील निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे. ***

# २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन : संविधानाचा दीप , स्वातंत्र्याचा अर्थ आणि नागरिकत्वाचा अभिमान

भारताच्या इतिहासात काही तारखा केवळ दिनदर्शिकेतील नोंदी नसतात ; त्या राष्ट्राच्या आत्म्यात कायमच्या कोरल्या जातात . २६ जानेवारी ही अशीच एक तारीख आहे . हा दिवस भारताने स्वतःला ओळख दिलेली , स्वतःचे शासनस्वरूप स्वीकारलेले आणि लोकसत्तेला घटनात्मक अधिष्ठान दिलेले आहे . प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ राष्ट्रीय सण नाही ; तो भारतीय लोकशाहीचा श्वास आहे , संविधानाचा उत्सव आहे आणि प्रत्येक नागरिकाच्या कर्तव्याची आठवण करून देणारा अभिमानाचा क्षण आहे .

स्वातंत्र्य मिळवणे ही ऐतिहासिक घटना होती ; पण स्वातंत्र्याला दिशा देणे , नियम देणे आणि मूल्यांची चौकट देणे हे त्याहून मोठे कार्य होते . १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला , पण २६ जानेवारी १९५० रोजी भारत खऱ्या अर्थाने स्वशासित झाला . त्या दिवशी भारताने स्वतःचे संविधान स्वीकारले आणि स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले . सत्ता राजा , सम्राट किंवा वारसाहक्काकडे न ठेवता , ती थेट जनतेकडे सुपूर्द करण्यात आली . म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा सरकारचा नाही , तर नागरिकांचा सण आहे . २६ जानेवारी ही तारीख निवडण्यामागेही इतिहासाची खोल जाण आहे . २६ जानेवारी १९३० रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने लाहोर अधिवेशनात पूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला होता . त्या दिवसापासून भारताने ब्रिटिश सत्तेखाली अर्धवट स्वातंत्र्य नाकारून संपूर्ण स्वराज्याचा संकल्प केला . म्हणूनच संविधान अंमलात आणण्यासाठी हाच दिवस निवडण्यात आला . हा निर्णय केवळ प्रशासकीय नव्हता ; तो स्वातंत्र्यलढ्याला दिलेला मान होता .

भारतीय संविधान हे एका दिवसात तयार झालेले नाही . जवळपास तीन वर्षे चाललेल्या चर्चांमधून , वादविवादांतून , अनुभवांतून आणि त्यागातून ते जन्माला आले . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले हे संविधान केवळ कायद्यांचा संग्रह नाही ; ते सामाजिक करार आहे . समानता , स्वातंत्र्य , न्याय आणि बंधुता या चार मूल्यांवर भारतीय लोकशाही उभी आहे . बाबासाहेबांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की संविधान कितीही चांगले असले , तरी ते अंमलात आणणारे लोक चांगले नसतील , तर ते अपयशी ठरेल . म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा आत्मपरीक्षणाचा दिवस आहे . भारतीय संविधान जगातील इतर संविधानांपेक्षा अनेक अर्थांनी वेगळे



आहे . हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे . इतक्या विविध भाषा , धर्म , जाती , संस्कृती आणि भौगोलिक विषमता असलेल्या देशात एकसमान नागरिकत्व देणारे हे दुर्मीळ उदाहरण आहे . धर्मनिरपेक्षता , सामाजिक न्याय , आरक्षण , मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये यांचा समतोल साधणारे हे संविधान आहे . जिथे अनेक देशांत संविधान सत्तेचे रक्षण करते , तिथे भारतीय संविधान नागरिकाचे रक्षण करते . हीच त्याची खरी ताकद आहे .

प्रजासत्ताक दिन साजरा करताना त्या असंख्य बलिदानांची आठवण होणे अपरिहार्य आहे . लोकमान्य टिळक , महात्मा गांधी , सुभाषचंद्र बोस , भगतसिंग , राजगुरू , सुखदेव , चंद्रशेखर आझाद यांच्यासारख्या असंख्य क्रांतिकारकांनी आपले आयुष्य देशासाठी अर्पण केले . त्यांच्या त्यागामुळेच संविधानातील प्रत्येक शब्दाला नैतिक अधिष्ठान लाभले . दे दी हमें आज़ादी बिना खड्ग बिना ढाल या ओळी आजही स्वातंत्र्याच्या मूल्यांची आठवण करून देतात . दिल्लीतील कर्तव्य पथावरील प्रजासत्ताक दिनाची परेड ही केवळ लष्करी शक्तीचे प्रदर्शन नाही . ती भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा , वैज्ञानिक प्रगतीचा आणि सामाजिक एकतेचा आरसा आहे . राज्यांचे चित्ररथ अनेकतेत एकता या संकल्पनेला दृश्य रूप देतात . मराठी गाण्यातील देश माझा रंगीला , संस्कृतीचा संगम झाला ही ओळ या दिवसाला अधिक अर्थपूर्ण बनवते .

प्रजासत्ताक दिन आपल्याला अधिकारांची आठवण करून देतो ; पण त्याच वेळी कर्तव्यांचीही जाणीव करून देतो . मतदान करणे , कायदा पाळणे , सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे , सहिष्णुता जपणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे . मराठी म्हण आहे अधिकार मागायचे असतील , तर कर्तव्ये पाळावी लागतात . लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नाही ; ती सतत चालणारी जबाबदारी आहे .

आजच्या काळात लोकशाहीसमोर नवी आव्हाने उभी आहेत . अफवा , द्वेष , असहिष्णुता आणि अर्धसत्य यामुळे लोकशाही कमजोर होऊ शकते . अशा वेळी संविधानातील मूल्ये अधिक घट्ट पकडणे गरजेचे आहे . लोकशाही टिकते ती भाषणांनी नाही ; ती टिकते कृतीतून , संयमातून आणि संवादातून . भारत हा तरुणांचा देश आहे . आजची तरुण पिढीच उद्याचा भारत घडवणार आहे . संविधान समजलेली , विवेकशील आणि जबाबदार तरुणाईच प्रजासत्ताक मजबूत करू शकते . ये देश है वीर जवानों का ही ओळ आजही तितकीच अर्थपूर्ण आहे . प्रजासत्ताक दिनाचा गर्व प्रत्येक भारतीयाला असावा , कारण हा देश आपला आहे , हे संविधान आपले आहे आणि ही लोकशाही आपली आहे . जगात अनेक देश स्वातंत्र्य मिळवतात ; पण फार थोडे देश लोकशाही टिकवतात . भारत हा त्यापैकी एक आहे . म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस केवळ ध्वजारोहणाचा क्षण नाही ; तो नागरिक म्हणून स्वतःकडे पाहण्याचा क्षण आहे. संविधान पुस्तकात नसते ; ते नागरिकांच्या आचरणात असते . आणि जेव्हा प्रत्येक नागरिक संविधान जगतो , तेव्हाच प्रजासत्ताक खऱ्या अर्थाने जिवंत राहते. जय हिंद । जय संविधान ।

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**

तहसीलदार बीड

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

※ वर्ष ०९ ※ अंक ३८ ※ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ ※ किंमत : २ रू.

# पर्यावरणमंत्री ना.पंकजाताई मुंडे या डीलिट पदवीने सन्मानित


परळी वैजनाथ (बातमीदार):- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजा मुंडे यांचा अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाने आज शैक्षणिक क्षेत्रातील मानाची डी लिट (मानद डॉक्टरेट) पदवी देऊन पुणे येथे सन्मान केला. या गौरवाने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

लोहगांव पुणे येथील अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचा दहावा दीक्षांत समारंभ आज मोठया थाटात पार पडला. ना. पंकजा मुंडे यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. ना. पंकजा मुंडे या राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री असून पर्यावरण व पशुसंवर्धन खात्यामार्फत गेल्या वर्षभरात अनेक लोकाभिमुख निर्णय त्यांनी घेतले आहेत, याशिवाय सामाजिक कार्यातही त्या सातत्याने अग्रेसर असतात. या कार्याची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांचा शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी 'मानद डॉक्टरेट' (डी.लिट.) देऊन आज सन्मान केला. या कार्यक्रमास अजिंक्य डी वाय पाटील विद्यापीठाचे अध्यक्ष व कुलपती डॉ अजिंक्य पाटील, श्री धरमकुमार सिरजी हाय कमिशनर ऑफ रिपब्लिक ऑफ गायना, डॉ. निशिकांत ओझा मुख्य सल्लागार इंटीग्रेटेड डिफेन्स स्टाफ भारत सरकार, श्रीमती पूजा पाटील चेअरमन डी वाय पाटील विद्यापीठ, आमदार बापूसाहेब पठारे, प्राध्यापक व पदवीप्राप्त विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***



## मयंक गांधींच्या संकल्पनेतून सिरसाळ्याचा होणार कायापालट!

परळी वैजनाथ (बातमीदार):- तालुक्यातील सिरसाळा हे मोठी लोकवस्ती असलेले प्रमुख गाव असून, येथे तालुक्यातील सर्वात मोठा आठवडी बाजार भरतो. या बाजारपेठेमुळे सुमारे ६० ते ६५ गावांचा हा परिसराचा केंद्रबिंदू ठरतो.



सिरसाळा पोहनेर हा गावातून जाणारा प्रमुख व वर्दळीचा रस्ता असून, त्याच्या सुशोभीकरणाचे काम जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टने हाती घेतले आहे. या उपक्रमामुळे गावाला एक नवी आणि आकर्षक ओळख मिळणार आहे. सिरसाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते ईदगाह चौक या मुख्य मार्गावरील दुभाजकावर ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने वृक्षारोपण करण्यात येत आहे.

रस्त्यावरील खड्डे आणि उडणाऱ्या धुळीमुळे नागरिक व व्यापाऱ्यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे या मार्गाचे सुशोभीकरण करून वृक्षारोपण करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी जलनायक मयंक गांधी यांच्याकडे केली होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ग्लोबल विकास ट्रस्टने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ३०० मीटर लांबीच्या रस्त्याच्या दुभाजकावर पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. नव्या वृक्षलागवडीमुळे रस्त्याचे आणि गावाचे सौंदर्य वाढणार असून, सिरसाळ्याला एक हरित आणि स्वच्छ ओळख मिळणार आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि व्यापारी वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे.

**ही चळवळ लोकचळवळ व्हावी - मयंक गांधी**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून आम्ही शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि त्याचबरोबर पर्यावरण संवर्धन साधणे, या दुहेरी उद्देशाने काम करत आहोत. संस्थेच्या वतीने आजपर्यंत ७ कोटींपेक्षा अधिक फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. सिरसाळा येथील रस्त्याचे सुशोभीकरण करताना झाडांची लागवड व त्यांचे संवर्धन यासाठीही विशेष उपाययोजना केल्या जातील. मात्र, स्वच्छ सिरसाळा, हरित सिरसाळा हा मूलमंत्र लक्षात ठेवून ग्रामस्थांनी आणि व्यापाऱ्यांनी या उपक्रमाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी केले आहे. ***